विद्यावार्ता®

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

SPECIAL ISSUE-2020 09

Peer Reviewed International Refereed Research Journal




शंकरराव पाटील महाविद्यालय, भूम व डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

यांच्या संयुक्त विद्यमाने

"राजर्षी शाहू, महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान" या विषयावर

एक दिवसीय राष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद



प्राचार्य
डॉ.श्रीकृष्ण चंदनशिव

MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

विद्यावार्ता™

शंकरराव पाटील महाविद्यालय, भूम

व

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

यांच्या संयुक्त विद्यमाने

एक दिवसीय आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय परिषद

२७/०२/२०२०

राजर्षी शाहू महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान

समन्वयक

प्रा. तानाजी बोराडे

डॉ. दयानंद शिंदे

डॉ. किशोरकुमार गव्हाणे

प्राचार्य

डॉ. श्रीकृष्ण चंदनशिव

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

Harshwardhan Publication Pvt.Ltd.

At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed

Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295

harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

37) छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांचे कृषीविषयक विचार
प्रा.डॉ. सुधाकर वि. वनवे, बीड ||111

38) महात्मा ज्योतिबा फुले यांचे आर्थिक विचार : एक अभ्यास
कापसे महानंदा ज्ञानोबा ||113

39) फुले शाहु आंबेडकर यांची आरक्षण विषयक भुमिका
प्रा. मदन कचरु मगरे, जालना ||115

40) फुले, शाहु, आंबेडकर यांचे आर्थिक विचार
प्रा. किशन मिराशे, नांदेड ||117

41) राजर्षी शाहू महाराज यांचे जलव्यवस्थापन विषयक विचार व कार्य
प्रा. शिंदे नारायण भर्तरीनाथ, बीड ||119

42) महात्मा फुले यांचे शैक्षणिक कार्य
प्रा. बोराडे तानाजी रामभाऊ, प्रा.लोंढे एस. के., भूम ||122

43) राजर्षी शाहू महाराज : प्रारंभिक राष्ट्रवादी नेते
डॉ. अर्चना टाक, लातूर ||126

44) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार
प्रा.डॉ. गितांजली सदाशिवराव मोटे, बीड ||128

45) महात्मा फुले यांचे शिक्षाविषयक विचार
जगदाळे नंदु रामभाऊ, अमरावती ||131

46) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक विचार
प्रा.डॉ. संजय उत्तम बेंद्रे, रायगड ||133

47) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अनुसूचित जातीतील योगदान
आकांक्षा पहिलवान, अहमदनगर, ज्योती आढाव, औरंगाबाद ||136

48) डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे कृषी विषयक विचार
जनार्दन जानजी देवरे, जळगाव ||138

www.vidyawarta.com/03 — http://www.printingarea.blogspot.com

शाळेत पाठविले नाही तर ती मुले उजाड, आळशी असंस्कारी, गुन्हेगार बनण्याची शक्यता अधिक आसणे म्हणून सर्व शेतकरी कामगार बंधूनी आपली मूल शाळेत पाठवून त्यांना शिक्षण द्यावे.

सारांश

जोतिबा फुले हे ऐतिहासिक पुरूष ठरले, त्यांच्या सामाजिक कार्याची नोंद इतिहासाने त्यांच्या सामाजिक समता पददलितांचा उध्दार व शैक्षणिक क्रांती या विविध कार्यामुळे भारताच्या इतिहासात नव्हेत तर जगाच्या इतिहासात त्याचे नाव सुवर्णक्षरांनी लिहिले गेले. ज्ञानाची गंगा महारवाडयातील झोपडीत नेणारा जोतिबा हा भगीरथ ठरला तीच ज्ञानयोगी, कर्मयोगी ठरला. मुलांची शाळा बंद पाडली तेव्हा जोतिबा स्वत: महारवाडयात गेले व हरिजन मुलांना शिकविले केवढी जिद्द! केवढी तळमळ! केवढा हा त्याग!

जेतिबा हे खरोखरीच महात्मा होते, असा कर्मयोगी, ज्ञानयोगी याच भूमीत जन्माला आला हे महाराष्ट्र भूमीचे सुदैवच म्हणावे.

संदर्भसूची

१. प्रा. देशमुख एल. जी. शिक्षणाचे तत्वज्ञानात्मक व समाजशास्त्रीय अधिष्ठान फकडे प्रकाशन कोल्हापूर २००३
२. डॉ. गाठाळ एस. एस. महाराष्ट्रातील समाजसुधारक
३. प्रा. ठोंबरे तानाजी महात्मा फुले यांचे शैक्षणिक कार्य

❑❑❑

46

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक विचार

प्रा. डॉ. संजय उत्तम बेंद्रे
बॅरि.ए.आर.आर अंतुले सायन्स महाविदयालय
म्हसळा, जि. रायगड

प्रास्ताविक:

आज बहुजन समाजात जागृतता येऊ लागली आहे. ते आधुनिक विचारांची कांस धरू लागली आहेत विचारात परिवर्तन होऊ लागले आहे. या सर्व घटनांना डॉ.बाबासाहेबांनी चालविलेल्या सामाजिक परिर्वनाच्या चळवळीचा स्पर्श आहे. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीला 'दलितांच्या आत्मसन्मानाची चळवळ' असे म्हणतात. डॉ बाबासाहेबांनी आपल्या विचारातून समाज जागृती व समाजसुधारणेसाठी त्याचा पाठपुरावा करणे किती गरजेचे आहे. याची पृष्टीही त्यांनी केली होती मानवाने केवळ शिक्षण घेतले म्हणजे त्याच्या सामाजिक विचारात बदल होतील असे बाबासाहेबाना अजिबात वाटत नव्हते तर शिक्षणाबरोबर मानवाने स्वत:मध्ये बदल करुन समाज बदलण्याचा विचार मनात तेवत ठेवले पाहिजे तरच खऱ्या अर्थाने सामाजिक परिवर्तन होऊ शकेल असा बाबासाहेबांचा सामाजिक विचार होता त्यासाठी त्यांनी खालील चळवळी त्यानी हाती घेतल्या. आणि या चळवळीमुळेच दलित, शोषित समुहांना नवे अस्मिता भान प्राप्त झाले.

'मुकनायक' मधील सामाजिक विचार:

समाज प्रबोधनाचे एक प्रभावी माध्यम म्हणून परिवर्तनाच्या संदर्भात वृत्तपत्राची उपयुक्तता डॉ आंबेडकरांनी जाणली होती. म्हणूनच त्यांनी शोषितांच्या प्रबोधनासाठी वत्तपत्रअसावे या निकडीतून छत्रपती शाहू महाराजांच्या देणगीतून मुकनायकाचा १९२० मध्ये जन्म झाला मुकनसयकासाठी डॉ आबेडकरानी तेरा

अग्रलेख लिहले आहेत या अग्रलेखातून हिदू समाजातील विषमतेवर, जातीभेदावर तीव्र प्रहार केले.

या देशामध्ये दारीद्रयाच्या विषमतेपेक्षा थोरली विषमता ही जातीय स्वरूपाची आहे असे ते म्हणतात.

किंबहुनाा हा देश विषमतेचे माहेर आहे, असे ते म्हणतात. या देशातीतील समाजात अनेक भेद आहेत.रंगभेद, शरीरभेद,आर्य अनार्यभेद,गोंड सोड भेद यावनी—द्रपिडभेद आणि सर्वात म्हत्वाचे जाती आणि धर्मभेद आहेत. भारतीय समाजातील जातीभेद हा र्धमग्रंथ प्रणीतचातुर्वण्यांच्या उच्च उच्च—निचभेद आहे. या गुणावर अधिष्ठीत नसुन व्यवस्थेवर चातुर्वण्यांच्या श्रेणीवर आहे.हा उच्च—निच गुण व गुणावर अधिष्ठीत नसुन चातुर्वण्यांच्या श्रेणीवर आहे.हा उच्च निच भेद आहे. या व्यवस्थेत ब्राम्हण सर्वोच्च स्थानी असुन त्यानंतर क्षत्रिय, वैश आणि शुद्राचा अंतिम कमांक आहे या कमानेच अधिकार विषम वितरण झाले आहे. आपल्या सामालिक विचारात बाबासाहेब म्हणतात की, हिंदू समाज हा मनो्न्याप्रमाणे आहे. व प्रत्येक जात त्याच्या एक—एक मजला आहे. पण विशेष लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे मनोन्यास सिडी नाही.

डॉ बाबासाहेब आंबेडकर वरिष्ठ वर्गाचा दुटप्पीणा, स्वार्थीपणा स्पष्ट करताना म्हणतात की वरिष्ठ वर्ग बहिष्कत समाजास कुन्याएवढीही किंमत देत नाही तो बहिष्कत वर्गाकडुन जुलूम जबरदस्तीने अनेक कामे करुन घेतों परंतु त्यांना स्पर्शही करित नाही. कत्रिम बंधने लादून त्याना स्वत: मध्ये सुंधारणाकरायला सांगतो दलित बहुजनांच्या पायातील श्रंखला जोपर्यत तुटणार नाही तो पर्यत हिंदू राष्ट्र आणि समाज सुधारत नाही

बहिष्कृत भारतातील सामाजिक विचार

बहिष्कृत भारत हे आंबेडकरांने दुसरे वत्तपत्र होते के वत्तपत्र दलित चळवळीचे मुखपत्र होते बहिष्कत भारताच्या अंकामधुन महाड चवदारतळे सत्याग्रहाविषयी इग्रज सरकार वरिष्ठ वर्ग आणि ब्राम्हणेत्तर समाज अणि अस्पृष्य समाजाची कोणती भूमिका असावयास पाहिजे होती याची चर्चा तर ते करतातच त्या सोबत धर्म समाजरचना समता बंधुता मानवी हक्क सामाजिक न्याय स्वातंत्र याचीही चर्चा करतात महाड येथे भरलेल्या कुलाबा जिल्हा बहिष्कृत समाज परिषदेतील पारित ठरावानुसार डॉ आंबेडकर आणि बहिष्कत समाजातील लोकांनी चवदार तळयातील पाणी प्राशन केले ता हक्क त्यांनी हिंदु समाजाच्या घटक आणि मानवी हक्क म्हणून बजावला होता, परंतू वरिष्ठ वर्गानी आणि ब्राम्हणेत्तरांनी त्यांच्यावर हल्ला करुन ते हक्क नाकारले महत्वाचे म्हणजे ब्राम्हणंच्या चिथावणीमुळे ब्राम्हणेत्तरांनी निशस्त्र अस्पश्यांना मारहाण केली या मारहाणीच्या प्रकरणास बाबासाहेबांनी दंगा असे न सबधोता धर्म सगंर असे संबोधलेआहे महाडच्या धर्मसंगर प्रसंगी जी मारहाण झाली त्यामागे वैचारिक मतभेदापेक्षा दंडेली, ब्राम्हणेत्तरांचे अज्ञान, ब्राम्हणांनी केलेली चिथावणी आणि ब्राम्हणी मानसिकता इत्यादी घटक कारणीभूत आहेत हिदू धर्मिय धर्मग्रंथाची पोपटपंची करताना सर्व माणसे ईश्वराची रुपं आहेत असे म्हणतात व मनाने मात्र जातिभेद अवित्रता स्पृश्य अस्पृश्य हा भेद मानतात म्हणून हिदूच्या या प्रवत्तीला ते दुटप्पीणा दांभिकपणा असे संबोधतात बहिष्कृतांच्या पाणी प्राशनावर आश्चर्य म्हणजे धर्ममार्तडानी तळयामध्ये गोमुत्र, शेण टाकून शुदधीकरण करुन अत्यंत प्रतिगामी धोरण अवलंबले जे त्यांचे कृत्य बाबासाहेब धर्मद्रोही ठरवितात अस्पृश्यता घालविण्यासाठी विचारशुन्य स्पृश्य लोकांना विचारप्रवत्त केले पाहिजे असेते म्हणतात तसेच अस्पृश्य लोक जो पर्यत अस्पृश्यतेच्या रुढीस हरकत घेत नाहीत तोपर्यत किंवा स्पृश्यांच्या हितसंबधास किंवा स्वार्थास धक्का पोहूचू शकतात काय.? असा त्यांना प्रश्न उपस्थित करुन तेच त्याचे उत्तर देतात. अस्पृश्य जरी दुर्बल दरिद्री सत्ताविहीन असले तरी ते स्पृश्य लोकांस जेरीस आणू शकतात. असा त्यांना विश्वास वाटतो. समकालीन वाद हा स्वराज्यशिवाय सांस्कतिक स्वरुपाचा देखील आहे. त्यासाठी अस्पृश्यांनी बहिष्कार आणि प्रतिकारचा मार्ग अवलंबला पाहिजे.

जनता पत्रातील सामजिक विचार:

जनता या पाक्षिक पत्रामधून आंबेडकांनी विविध सामाजिक समस्या आणि त्या विषयाच्या अनुशंगाने वैचारिक लेखल केले आहे सामाजिक, राजकिय, धार्मिक आणि शैक्षणिक असे त्याचे स्वरुप आहे कॉग्रेस हिंदू समाज रचनेतील फरबदलास विरोध करते. कारण ती देखील हिंदू समाज सनातन आहे असे मानते. महत्वाचे

म्हणजे बहूजन समाजाचा ओढा तिच्याकडे आहे हिंदू महासभा धर्माभिमानी, मुस्लिमद्वेषी आणि सुधारणा विरोधी आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी जाती भेदासाठी ब्राम्हणी धर्म ग्रंथानाच जबाबादार धरले आहे. वर्णभेद व जातीभेद वेगळे नसून त्याचेच विक्षीप्त रूप आहे.म्हणून ते म्हणतात की वर्णभेद हा मुळचा व जातीभेद हे त्याचे रूपांतर आहे.हाच या विषयासंबधी खरा सिध्दांत आहे त्याचे विश्लेषण करतात ते म्हणतात की, पुरूष सुक्तातील चातुर्वण्य व्यवस्था निर्माण करण्यामागे सामाजिकदृष्टया विकृत स्वरूपाची होती. काणत्याही समाजास श्रमविभाग आवश्यक असतो. समाज सौख्यासाठी ते आवश्यक असले तरी आणि तो सहजगत्या निर्माण होत असला तरी तो त्यांचा दोष असा की, त्यामुळे व्यवसाय गट,तट पडतात.ऐक्यभाव लोप पावतो व कलह वाढतो डॉ.आंबेडकर जातीभेदास मातृसावर्णाच्या पध्दतीस जबाबदार धरतात.

हिंदू समाजात मातृसावर्णाची पध्दत विचित्र असून मातृसावर्ण्या पूर्वी हिंदू समाजात पितृसावर्ण्याची पध्दत अस्तित्वात होती असे म्हणतात. हिंदू समाजात आईच्या जातीवरूण मुलाची जात ठरते.

इतर जगात मात्र क्षेत्रापेक्षा बीजश्रेष्ठ असा सिध्दांत सर्व मान्य आहे.मातृसावर्णाची पध्दती म्हणजे आईच्या जातीवरून मालाची जात ठरविण्याची पध्दत आमलात येण्यपुर्वी याच हिंदू समाजात पितसावर्णाची म्हणजे आई कोणत्याही वर्गातील असो तिच्यापासून झालेल्या मुलाची जात पित्याच्या जातीवरुन सामाजिक विचाराचा घणाघात करुन समाज जागृतीसाठी प्रयत्न केले म्हणूनच त्यांच्याबददल म्हटले जाते की डॉ आंबेडकर हे निर्भीड व ध्येयवादी पत्रकार होते त्यांनी जाती व्यवस्था वर्णाव्यवस्था ब्राम्हणशाही हिंदू धर्म व ग्रंथावर टिका केली.

डॉ आबेडकर अस्पृश्यता निवारणाचा मार्ग सहविवाह सहभोजनाबरोबर साहित्यही होऊ पाहत आहे असे प्रबोधनकार ठाकरे यांच्या खरा ब्राम्हण या सामाजिक नाटकाची समीक्षा करित असताना म्हटले आहे विचारक्रांती झाल्याशिवाय आचारात फेरबदल होवु शकत नाही आणि विचारक्राती घडवून आणण्यास साहित्यासारखा दुसरा उपयुक्त मार्ग नाही, असे ते म्हणतात यातून त्यांची साहित्याकडे पाहण्याची परिवर्तनवादी दृष्टी प्रतित होते. डॉ आबेडकराचा सामाजिक संघर्ष किंवा परिवर्तनाचा लढा दलित शोषित वंचिताच्या व्यापक हितासाठी होता तो कोणत्याही एका जातीपुरता मर्यादित नव्हता तथापी या परिवर्तन लढयापासून काही मातंग आणि चर्मकार दुरच राहिले केवळ दुर राहिले असे नाही तर त्यानी डॉ आबेडकरावर व्यक्तिगत स्वार्थापायी टिका केली आहे दलित जाती अंतर्गत भेद नष्ट व्हावा यासाठी बाबासाहेबांनी प्रयत्न केले दलित जाती संदर्भात डॉ आंबेडकाराची नेहमीच व्यापक भुमिका घेतली आहे की भूमिका त्यानी ते मातग परिषदेला सबोधित करित असताना मांडली आहे मातंग व चांभाराना ते स्पष्टपणे बजावतात मातंग आणि चांभार महारांच्या दुस्वासापोटी त्यापासून दूर राहिले तर त्याचे काही आडणार नाही परतु महाराशिवाय मांग आणि चांभाराचे बरेच अडु शकलते.

संदर्भ

१. शेरे निळकंठ : डॉ बाबासाहेब आबेडकर आणि दलित वैचारित वाड़मय सुविधा प्रकाशन पुणे प्रथमवृत्ती २००५पृ ७३.

२. कित्ता : पृ ७३

३. वाघमारे प्रदिप : आधुनिक महाराष्टाचा इतिहास मनन प्रकाशन मुबंई प्रथम आवृत्ती २०११ पृ.१२४

४. कित्ता :पृ ८५

५. भामरे जितेद्र : आधुनिक महाराष्ट शेठ प्रकाशन मुबंई प्रथम आवृत्ती २०११ पृ १२४

६. शेरे निळकठ : डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि दलित वैचारिक वाड : मय सुविधा प्रकाशन पुणे प्रथम आवृत्ती २००५ पृ ८६

❑❑❑